गेले. चोवीस तास घरातच अडकून राहावे लागल्यामुळे अनेकांच्या स्वभावात चिडचिडेपणा निर्माण होऊ लागला. काहींना नैराश्याला सामोरे जावे लागले तर काहींना असमाधान वाटू लागले. तर काहींना तणाव निर्माण होऊन भीतीही वाटू लागली. टाळेबंदीमुळे उपजीविकेवर आलेले संकट, अन्न-धान्याचा संभाव्य तुटवडा, नोकरी जाण्याची या ठळक बाबी बाजूला ठेवल्या तरी एकाकीपण हेच सर्वांना बेचैन करण्यास पुरेसे होते. इतकंच नाही तर या सूक्ष्म अशा विषाणुने अनेकांच्या मानसिक आरोग्यावर अनेक तऱ्हेने प्रभाव टाकला. त्यामुळे कोरोना विषाणुमुळे मानसिक आरोग्याच्या धोक्याकडे अधिक प्रमाणात लक्ष वेधले गेले आहे. टाळेबंदीच्या या परिस्थितीत भारतातील खेड्यापाड्यातून शहराकडे पोटा-पाण्यासाठी स्थलांतर करणाऱ्या लाखो गरीबांकडे मात्र सर्वांच लक्ष वेधलं गेलं. कारण भारतात ग्रामीण भागातून शहरांमध्ये रोजगारासाठी स्थलांतरित झालेला मोठा वर्ग आहे. कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे व टाळेबंदीच्या परिस्थितीत या स्थलांतरीत मजुरांची हतबलता वाढत गेली. कारण अचानक घोषित झालेल्या टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजूर अधिक प्रमाणात अस्वस्थ झाले. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात कोरोना विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे आणि टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजुरांच्या मनस्थितीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेतला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१) ताण-तणावाची संकल्पना आणि लक्षणे अभ्यासणे.

२) कोरोना आणि टाळेबंदीत मजुरांची स्थिती अभ्यासणे.

३) कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजुरांच्या मनस्थितीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.

**शोध निबंधाची गृहीतके :**

१) कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजूर बेरोजगार झाले त्यामुळे त्यांना ताण-तणावाला सामोरे जावे लागले.

२) कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजुरांच्या मनस्थितीचा उद्रेक झाला.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधन करताना विश्लेषणात्मक, वर्नात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. तसेच हे संशोधन दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. तथ्य संकलनासाठी वर्तमान पत्रे, नियतकालिके, संदर्भ पुस्तके, इंटरनेट वरील माहितीचा उपयोग करून

**ताण-तणाव :**

प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनात कोणत्या ना कोणत्या तरी ताण तणावाला तोंड द्यावे लागते. राग करणे, चिडचिड करणे, घाबरणे, गुदमरणे, कुचंबणे, अस्वस्थ वाटणे. अशा अनेक अनुभवांच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती आपले ताण-तणाव व्यक्त करीत असतो.

प्रत्येकाची ताण-तणावाची कारणे वेगवेगळी असू शकतात. जसे की- आर्थिक स्थिती ढासळणे, हृद्यविकाराचा झटका येणे, परीक्षेच्या भीतीमुळे आजारी पडणे, नोकरी गमावल्यामुळे सतत चिंतेत राहणे इत्यादी.

सध्या आर्थिक स्थिती, सामाजिक व्यवस्था, कामाच्या पद्धती, कामाच्या वेळा, जीवनशैली यांमध्ये झपाट्याने बदल होत असल्यामुळे आपल्या आसपासची परिस्थिती देखील वेगाने बदलत आहे. या परिस्थितीचे विश्लेषण जेव्हा नकारात्मक, इच्छेविरुद्ध, अपेक्षेपेक्षा वेगळ्या दिशेने वा आपल्या हाताबाहेर अशा दिशेने जाऊ लागते तेव्हा ताण- तणावाला सुरुवात होते. वैफल्य, संघर्ष, अंतर्गत आणि सामाजिक दबाव इत्यादी कारणांमुळे मानसिक ताण निर्माण होण्याची शक्यता असते. प्रत्येक व्यवसायात ताण-तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. अशा ताण-तणावाचा सामना करण्याची क्षमता प्रत्येक व्यक्तीमध्ये असेलच असे नाही. परिस्थितीनुसार ताण-तणाव व्यक्तीच्या शारीरिक, भावनिक, मानसिकतेवर परिणाम करू शकतो. अतितणावामुळे व्यक्ती असमाधानी, चिडचिडी, निराश बनते.

रिचर्ड लाझारस यांच्या मतानुसार, "ताण एक प्रकारची भावना असते. जेव्हा व्यक्ती असा विचार करते की, तिच्या जवळ असणाऱ्या वैयक्तिक आणि सामाजिक साधनांपेक्षा तिच्या गरजा अधिक असतात. तेव्हा निर्माण होणारी भावना म्हणजे ताण होय."

**ताण-तणावाची लक्षणे :**

- चिडचिड होणे, अस्थिर मनस्थिती
- थकवा जाणवणे.
- डोके काम न करणे.
- झोप न लागणे
- आत्मविश्वास गमावणे
- निराश होणे
- चिंता करणे
- घाबरणे

**टाळेबंदीत स्थलांतरीत मजुरांची स्थिती :**

कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाने जागतिक पातळीवर अनेकांच्या जीवाला घोर लावला. तसेच या साथीच्या रोगामुळे संपूर्ण जग मानसिकदृष्ट्या विकलांग झाले आहे. कोरोना काळात सर्व उद्योग, व्यवसाय, कारखाने बंद पडल्यामुळे तिथल्या मजुरांसमोर उदरनिर्वाहाचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला. कोरोना विषाणुचे हे संकट महायुद्धापेक्षा ही भयंकर असणार आहेत, असे मत आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने व्यक्त केले. कोरोना विषाणुच्या संकटाबरोबरच भारतात स्थलांतरीत मजुरांच्या विदारक अवस्थेचा

विषय बहुचर्चित राहिला. कारण कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे घोषित करण्यात आलेल्या टाळेबंदीत सर्वात वाईट अवस्था या स्थलांतरीत मजुरांची झाली. भारतातील एकूण कामगारांपैकी सुमारे 89 टक्के मजूर हे असंघटित क्षेत्रातील आहेत. तसेच भारतात २०११ च्या जणगणनेनुसार ३७ टक्के अर्थातच ४५ कोटी लोकसंख्या ही स्थलांतरित मजुरांची आहे. त्यापैकी ४२ टक्के स्थलांतरीत मजुरांच्या घरात दोन वेळेचे अन्न पुरेशा प्रमाणात नाही. कोरोना काळात भारतातील मोठ मोठ्या महानगरांत स्थलांतरीत मजूर होते. देशव्यापी टाळेबंदी लागू केल्यानंतर अनेक मोठ-मोठ्या शहरांतील बस स्थानके, रेल्वे स्थानके हजारो लाखो स्थलांतरित मजुरांच्या गर्दीने ओसंडून गेली. टाळेबंदी घोषित करताना या स्थलांतरीत मजुरांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाचा, आरोग्याचा, सुरक्षेचा कोणताही विचार शासनातर्फे केला गेला नाही. परिणामी कोरोना आणि टाळेबंदीच्या काळात हातावर पोट असणाऱ्या या स्थलांतरीत मजुरांवर कोरोनामुळे अचानक सुलतानी संकट कोसळले आणि ते एकदम रस्त्यावर फेकले गेले. भारतात लाखो कामगारांचे जीवन हे रोज मिळणाऱ्या कामावर अवलंबून आहे आणि त्यातून मिळणाऱ्या पैश्यातूनच त्यांचा दिवस कसाबसा जातो. त्यामुळे टाळेबंदीच्या काळात पोटा-पाण्याचा प्रश्न सुटणार कसा? हा यक्ष प्रश्न या मजूर वर्गासमोर आवासून उभा राहिला होता. कारण कोरोना विषाणुचा वाढता उद्रेक पाहता टाळेबंदीच्या काळात या मजुरांना मजुरीसाठी घराबाहेर पडता येत नव्हते. तसेच ते आपल्या मुळगावी जाऊ शकत नव्हते. कोरोना विषाणुमुळे निर्माण झालेल्या परिस्थिती पुढे हतबल होऊन या मजुरांनी सुरवातीचे दीड-दोन महीने कसे बसे बेरोजगारीत घालवले. आर्थिक अडचणींमुळे त्यांना आपल्या व आपल्या कुटुंबियांच्या दैनंदिन गरजा भागविणे देखील अवघड झाले. पूर्णपणे स्थलांतरीत मजूर हे बेरोजगार झाले होते. टाळेबंदीमुळे या स्थलांतरीत मजुरांचे जीवन ठप्प झाल्याची स्थिती निर्माण झाली. त्यांच्यापुढे त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. पोट भरण्यासाठी त्यांच्याकडे अन्न शिल्लक उरले नव्हते. उपासमारीमुळे या स्थलांतरीत मजुरांची स्थिती अतिशय दयनीय झाली. त्यामुळे मजुरांना मृत्यूची जास्त भीती वाटू लागली. घरभाडे भरण्यासाठी खिशात पैसे नव्हते. अशा स्थितीत त्यांना फार मोठ्या प्रमाणात मानसिक ताण-तणावाचा सामना करावा लागला. स्वतःच्या व कुटुंबियांच्या भुकेची, आरोग्याची चिंता त्यांना वाटू लागली. काम करण्याची क्षमता असूनही या मजुरांना रोजगार मिळत नव्हते. त्यामुळे त्यांना आपल्या मुलांच्या शिक्षणाची व भवितव्याची चिंता सतत भेडसावत होती.टाळेबंदीच्या या काळात स्थलांतरीत मजुरांवर फार मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक, मानसिक व भावनिक आघात झाले. थोडक्यात कोरोना महामारीने या स्थलांतरीत मजुरांच्या पाठीवर तर मारलेच शिवाय पोटावरही मारले. जेव्हा शासनाकडून टाळेबंदीचे नियम अजून कडक करून टाळेबंदीची मुदत जेव्हा वाढविण्यात आली तेव्हा या मजुरांचा संयम तुटला. परिणामी त्यांच्यासमोर एकच पर्याय उपलब्ध होता आणि तो म्हणजे शहरातून आपल्या मूळ गावी परतणे. सर्व सामाजिक, आर्थिक व मानसिक परिस्थितीला सामोरे जात आपल्या मुळगावी परतण्यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. आपल्या संसाराचे गाठोडे डोक्यावर घेऊन ते आपल्या कुटुंबियांसोबत पायीच आपल्या मुळगावी निघाले. इथूनच त्यांचा जीवघेणा प्रवास सुरु झाला. संपूर्ण देशभरात या स्थलांतरीत मजुरांच्या लोंढ्याचे - लोंढे रस्त्यावर दिसू लागले. यामध्ये अनेक तरुण, वृद्ध, गरोदर स्त्रिया, लहान मुले आपल्या गावी परतण्यासाठी पायी निघाले. कारण टाळेबंदीत सर्व काही बंद असल्यामुळे या मजुरांना रोजगाराचे कोणतेही मार्ग खुले नव्हते. हे मजूर महानगरांत

फक्त नोकरी, व्यवसाय या अनुषंगाने आले होते. वर्षानुवर्षे महानगरांमध्ये हे मजूर हाताला मिळेल ती निकृष्ट व हलक्या दर्जाची कामे करून जगत होते. त्यांना त्यांच्या कामातून मिळणारे वेतन देखील असमाधानकारक व अनिश्चित होते. या मजुरांमध्ये प्रामुख्याने हमाल, रस्त्यांवरील फेरीवाले, रस्त्यावर छोटे-मोठे खाद्य पदार्थांचे गाड्या लावणारे, घरकामगार, रिक्षाचालक, वीटभट्ट्यांवरील कामगार, कचरावेचक, टॅक्सी ड्रायव्हर, बांधकाम मजूर, हॉटेल मजूर, वॉचमन इत्यादी मजुरांचा समावेश होता. मात्र भारतात अचानक झालेल्या टाळेबंदीमुळे त्यांच्या हाताला काम नव्हते. त्यांच्यापुढे खाण्यापिण्याचा मोठा प्रश्न उद्भवलेला होते. या मजुरांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या मनात असहायतेच्या वेदनादायी भावना निर्माण झाल्या होत्या. मात्र आपल्या मुळगावी परतण्यासाठी त्यांना वाहनांची कोणतीही सोय नव्हती. कारण टाळेबंदी असल्यामुळे सर्व प्रकारच्या सार्वजनिक आणि खासगी वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यामुळे या मजुरांना आपल्या मुळगावी परतण्यासाठी शेकडो मैल पायी प्रवास करावा लागला. अनेकांना आपल्या मूळगावी, आपल्या घरी पोहोचण्यासाठी कित्येक दिवस लागणार होते. काही जणांचा तर वाटेतच मृत्यूही झाला. मजुरांचे हे स्थलांतर थांबवण्यासाठी शासनाने स्थलांतरित मजुरांसाठीआणि त्यांच्या कुटुंबियांसाठी अन्न, पाणी, निवारा, जीवनावश्यक वस्तू, आरोग्य सुविधा, आर्थिक मदत, आणि समुपदेशन इत्यादी बाबी पुरविण्याचे आश्वासन दिले. मात्र शासनाची ही मदत मजुरांसाठी पुरेशी नव्हती. तसेच बहुतांश स्थलांतरीत मजुरांकडे श्रमिक ओळखपत्रे, बँक खाते नसल्यामुळे शासनाच्या आर्थिक मदतीचा लाभ घेणे त्यांना शक्य नव्हते.

**स्थलांतरीत मजुरांच्या मनस्थितीवर परिणाम :**

भारतात शारीरिक आरोग्याच्या बाबतीतच नव्हे तर मानसिक आरोग्याबाबतही नकारात्मकता आणि प्रतिकूलता दिसून येते. कोरोना विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावमुळे एकटेपणा, नैराश्य, निद्रानाश, काळजी, राग, चिडचिड, मन न रमणे, भीती,  भीती, भूक न लागणे, आत्मविश्वासाचा अभाव, ताण-तणाव, नकारात्मक भावना  अशा समस्यांचा सामना समाजातील बहुतांश लोकांना करावा लागला आहे. अनेकांना आयुष्यात काही उरलंच नाही, असं वाटू लागलं आहे. कोरोनामुळे होणारे मानसिक परिणाम हे दूरगामी असतील अशी चिंता मानसोपचारतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. कोरोनामुळे ओढवलेली बेरोजगारी, पगार कपात, किंवा आर्थिक अडचणी याचा मजुरांच्या मानसिक स्थितीवर खोलवर परिणाम होण्याची दाट शक्यता असते. कोरोनामुळे अनेक स्थलांतरीत मजुरांना आपले रोजगार गमवावे लागले आहे. त्यामुळे आर्थिक असुरक्षितता, कोरोनाची भीती, भविष्याची चिंता, उदरनिर्वाहाचा सतत काळजी, नैराश्य, नकारात्मक विचार, अस्वस्थता अशा अनेक प्रकारच्या मानसिक समस्यांना मजुरांना तोंड द्यावे लागले आहे. हाताला काम नाही, पोटाला भाकरी नाही, गावी परतण्यासाठी वाहन नाही, सगळीकडे लॉकडाऊन! या परिस्थितीमुळे स्थलांतरीत मजुरांचे हाल होऊन दैनंदिन जीवन विस्कळीत झाले. याचा त्यांच्या मनस्थितीवर अतिशय वाईट पद्धतीने परिणाम झाला.

- कोरोना विषाणु आणि टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजुरांच्या मनात चिंता आणि भितीचे वातावरण निर्माण झाले.
- टाळेबंदीत आर्थिक समस्या निर्माण झाल्यामुळे स्थलांतरित मजुरांच्या मनावरील ताण-तणाव वाढला.

- कोरोना विषाणुमुळे अचानक ओढावलेल्या बेरोजगारीचा स्थलांतरीत मजुरांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला.
- रोजंदारी थांबल्यामुळे जगायचे कसे? पोट भरायचे कसे? मुलांचे शिक्षण पूर्ण करायचे कसे? या गोष्टींची काळजी स्थलांतरीत मजुरांना वाटू लागली.
- टाळेबंदीत रोजगार गेल्यामुळे स्थलांतरीत मजुरांना कर्ज परत फेडीची चिंता लागली.
- कोरोना विषाणुमुळे स्थलांतरीत मजूर अस्वस्थ होऊन आपल्या मुळगावी परतण्यास शेकडो मैल प्रवास करत पायी निघाले.
- टाळेबंदीच्या काळात स्थलांतरीत मजुरांचा आत्मविश्वास कमी होऊन शहरात आपल्याला कोणी वाली नाही अशी भावना त्यांच्या मनात निर्माण झाली.
- आपल्या मुळगावी परतत असताना आलेल्या आव्हांनामुळे स्थलांतरीत मजुरांना नैराश्याचा सामना करावा.
- एकंदरीतच कोरोना विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे आणि अचानक लागू केलेल्या टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजुरांच्या मनस्थितीचा उद्रेक होऊन त्यांचा संयम तुटला.

**समारोप :**

कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे जागतिक पातळीवर सर्व क्षेत्रात अनेक प्रकारचे अमुलाग्र बदल झाले. काही बदल हे सकारात्मक स्वरूपाचे होते तर काही नकारात्मक स्वरूपाचे होते. परंतु भारतात अचानक जाहीर झालेल्या टाळेबंदीमुळे स्थलांतरीत मजुरांच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर तसेच त्यांच्या शारीरक, मानसिक व भावनिक परिस्थितीवर अत्यंत विघातक स्वरूपाचे परिणाम झाले. टाळेबंदीत भारतातील वेगवेगळया राज्यांतील विशेषत: असंघटित क्षेत्रात काम करणारे अनेक स्थलांतरीत मजूर मोठ-मोठ्या महानगरांत अडकून पडले होते. टाळेबंदीच्या काळात त्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली. कारण कोरोना विषाणुचा उद्रेक दिवसेंदिवस वाढतच होता. स्थलांतरीत मजुरांवर अचानक रोजगार गमाविण्याची वेळ आली. त्यामुळे स्थलांतरीत मजुरांची मानसिक स्थिती पूर्णतः ढासळली. भविष्याच्या चिंतेने या मजुरांना नैराश्याच्या खाईत लोटले. टाळेबंदीच्या ताबडतोब होणाऱ्या परिणामांची झळ देशातील सर्वाधिक गरीब वर्गाला विशेष करून मजुरांना बसू नये याची काळजी घेणे ही शासनाची जबाबदारी होती. मात्र शासनाकडून करण्यात आलेले उपाय पुरेसे नव्हते.

**संदर्भ सूची :**


- पाटील दिलीप, कोरोना व्हायरस - एक संकट की संधी?
- कांबळे उत्तम, श्रमिकांचे जग:काल, आज आणि उद्या, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २०१२
- Coronavirus disease 2019 (COVID-19) Situation Report – 77" World Health Organization.
- महाराष्ट्र टाईम्स ३१ ऑक्टोबर, २०१९

- महाराष्ट्र टाईम्स ३१ मार्च, २०२०
- सकाळ ५ एप्रिल, २०२०
- लोकमत १७ मे २०२०
- लोकमत २० सप्टेंबर, २०२१
- दैनिक प्रभात, १० एप्रिल २०२१

**Cite This Article:**

* प्रा. किरण नाईकनवरे, *(2022).* कोरोना, टाळेबंदी आणि स्थलांतरीत मजुरांची मनस्थिती, ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (III) May – June,*** *243-249.*